स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

:: **सुधारीत दीक्षांत समारंभ सूचना** ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा एकविसावा दीक्षांत समारंभ शुक्रवार दि. १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्याचे ठरले होते. परंतू सदरील दीक्षांत समारंभ हा **मंगळवार दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता** विद्यापीठ प्रांगणात घेण्याचे ठरले आहे. तरी उपरोक्त तारखेत झालेल्या बदलाची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे **मा.कुलपती चे. विद्यासागर राव,राज्यपाल,महाराष्ट्र राज्य** हे भुषविणार असुन **पद्मविभुषण मा. डॉ. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन, माजी अध्यक्ष भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO)** हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार आहेत तसेच **मा.कुलगुरु, डॉ. उध्दव भोसले** यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न होणार आहे.

दीक्षांत समारंभात उपस्थित राहून पदवी/पदविका घेण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी **दि. २६ फेब्रुवारी, २०१९** रोजी **सकाळी ८.३० ते १०.३० पर्यंत** विद्यापीठ कार्यालयात येवून पदवी प्रमाणपत्र घ्यावे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी पदवी/पदवीका प्रमाणपत्रासाठी भरलेल्या शुल्काची व आवेदनपत्र दाखल केल्याची मूळ पावती सादर करणे आवश्यक आहे. यावेळी विद्यार्थ्यांना विद्याशाखानिहाय ठरविण्यात आलेले उपरणे अनामत रक्कम रु.१५०/– स्विकारुन दीक्षांत समारंभाच्या वेळेपूरते परिधान करण्यासाठी दिले जातील. दीक्षांत समारंभ संपल्यानंतर उपरण्यासाठी घेतलेली अनामत रक्कम रु.१५०/– पैकी उपरणे शुल्कापोटी रु.१०/– वजा करुन उर्वरीत रक्कम रु.१४०/– परत करण्यात येईल. या समारंभासाठी उपस्थित राहून पदवीप्रमाणपत्र घेणा–या विद्यार्थ्यांनी सोबत ओळखपत्र ठेवणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभामध्ये उपस्थित राहून पदवी/पदवीका ग्रहण करणा–या विद्यार्थ्यांनी पांढरा पायजमा/पॅन्ट व पांढरा बुशर्ट (कॉलरसहित) तसेच विद्यार्थीनींनी पांढरी साडी व पांढरा ब्लाउज किंवा पांढ–या रंगाच्या ओढणीसह पांढरा पंजाबी ड्रेस परीधान केलेला असावा. सबब, सर्व संबंधीतांनी वरील प्रमाणे सुधारीत सुचनेची नोंद घ्यावी.

दीक्षांत समारंभ सकाळी ठिक ११.०० वाजता सुरु होणार असुन सर्व विद्यार्थी व निमंत्रितांनी दीक्षांत मंडपात सकाळी ठिक १०.३० वाजता स्थानापन्न व्हावे. पीएच्.डी.पदवी धारकांचे पदवी प्रमाणपत्र हे दुपारच्या सत्रात (दुपारी ३.०० वाजता) दीक्षांत मंडपात वितरीत करण्यांत येतील.

**डॉ. रवि एन. सरोदे**
**संचालक-प्रीक्षा व मुल्यमापन मंडळ**